RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ३, अंक २] बुधवार, जानेवारी ४, २०१७/पौष १४, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक २

## प्राधिकृत प्रकाशन

### नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ४ जानेवारी २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस. १२१५/२३३३/अंकुबपअक्षे/प्र. क्र. ११२/१५/नवि-१२.—ज्याअर्थी, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस. १२०४/९४१/प्र. क्र. १६३/०४/नवि-१२, दिनांक २५ जुलै २००५ अन्वये (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) भागशः मंजूर झाली असून ती दिनांक १२ ऑगस्ट २००५ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या क्षेत्रासाठीची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस. १२०४/९४१/ प्र. क्र. १६३/०४/(भाग-२)/नवि-१२, दिनांक ११ ऑगस्ट २००८ रोजी मंजूर झाली असून ती दिनांक १ सप्टेंबर २००८ पासून अंमलात आली आहे (यापुढे जिचा उल्लेख " उक्त वगळलेले क्षेत्र " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या उक्त वगळलेल्या क्षेत्राच्या प्रस्तावानुसार मौजे शिरढोण, ता. कल्याण येथील स. नं. ८६, ९५ व १३३, क्षेत्र सुमारे ५४.४९ हे. आर. या जमिनी झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन याकरिता दर्शविण्यात आल्या आहेत (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त जमिनी " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या योजनेच्या अनुषंगाने राज्य शासनाने सन २०१५ ते २०१९ या कालावधीमध्ये मुंबईमध्ये सुमारे ११ लाख व उर्वरित राज्यामध्ये सुमारे ६ ते ७ लाख घरे बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे आणि त्यास अनुसरुन म्हाडाने ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील काही जागा निवडून त्या जमिनींवर म्हाडासाठी परवडणारी घरे बांधण्याची योजना असून, त्याअनुषंगाने उक्त जमिनी झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन या निर्देशनामधून वगळून म्हाडासाठी परवडणारी घरे याकरिता दर्शविण्याची विनंती उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी शासनास दिनांक १० सप्टेंबर २०१५ च्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, म्हाडाचा प्रस्ताव विचारात घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त जमिनी ह्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन या निर्देशनामधून वगळून म्हाडासाठी परवडणारी घरे (Affordable Housing for MHADA) याकरिता निर्देशित करणे आणि त्याकरिता उक्त अधिनियमातील कलम ३७ (१कक) प्रमाणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील उप-कलम (१कक) अन्वये प्रस्तावित फेरबदलासंदर्भात शासनाच्या नगरविकास विभागाने क्रमांक टीपीएस. १२१५/२३३३/ प्र. क्र. ११२/१५/नवि-१२, दिनांक ३ सप्टेंबर २०१६ अन्वये आम जनतेच्या हरकती/सूचना मागविण्यासाठीची सूचना (नोटीस) **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग एक-कोकण विभागीय पुरवणीमध्ये ६ सप्टेंबर २०१६ रोजी पृष्ठ क्र. ५ ते ८ वर प्रसिद्ध केली आहे आणि विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतीवर संबंधितांना सुनावणी देऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे म्हणणे ऐकून घेऊन शासनास अहवाल सादर करण्याकरिता सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची अधिकारी (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त अधिकारी " असा करण्यात आला आहे) म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियुक्त अधिकारी यांचा सादर अहवाल विचारात घेऊन आणि संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त जमिनींपैकी स. नं. ८६ मधील ६२८०.०० चौ.मी. क्षेत्रासाठीचा उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करणे व उर्वरित उक्त जमिनीसंदर्भात प्रस्तावित फेरबदल अंतिमतः मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमांच्या कलम ३७ चे उप कलम (१कक)(सी) व त्यानुषंगाने प्राप्त अधिकारात शासन उक्त जमिनींपैकी स. नं. ८६ मधील ६२८०.०० चौ.मी. क्षेत्रासंदर्भात प्रस्तावित फेरबदल नामंजूर करीत आहे आणि उर्वरित उक्त जमिनींच्या प्रस्तावित फेरबदलास अंतिम मंजूरी देत आहे व त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक २५ जुलै २००५ च्या अधिसूचनेतील फेरबदलांच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

**नोंद**

" भाग नकाशामध्ये **दर्शविल्याप्रमाणे** अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्रामधील मौजे शिरढोण, ता. कल्याण येथील स. नं. ८६ (भाग), ९५ व १३३ या जमिनी झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन या निर्देशनामधून वगळून म्हाडासाठी परवडणारी घरे (Affordable Housing for MHADA) याकरिता दर्शविण्यात येत आहेत. "

उपरोक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरिता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे.

सदरची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* वेबसाईटवर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अशोक का. खांडेकर,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 4th January 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1215/2333/AKBNA/CR-112/15/UD-12.—Whereas, the Development Plan for Ambernath, Kulgaon-Badlapur and surrounding notified area (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1204/941/CR-163/04/UD-12, dated the 25th July 2005 (hereinafter referred to as the " the said Notification ") which has come into force with effect from 12th August 2005 and the Excluded Part of the said Development Plan (hereinafter referred to as " the said Excluded Part ") has been sanctioned by Government in Urban Development Department, under section 31(*1*) of the said Act, *vide* notifications No. TPS-1204/941/CR-163 /04/(part-2)/UD-12, dated the 11th August 2008, which has come into force with effect from the 1st September 2008 ;

And whereas, in the said Excluded Part of the said Development Plan, lands bearing S. No. 86, 95 and 133 of village Shirdhon, Taluka Kalyan having area approx. 54.49 H. are designated for the Slum Rehabilitation Scheme (hereinafter referred to as the " the said lands ") ;

And whereas, considering scheme of Central Government of Housing for all upto 2022, the State Government has decided to construct approx. 11 lakh houses in Mumbai and approx. 6 to 7 lakhs in rest of Maharashtra and as such MHADA has selected some lands in Thane, Palghar and Raigad district for construction of Affordable Housing for MHADA, and the Vice President and Chief Executive Officer, MHADA has requested Government to delete the said lands from the designation of Slum Rehabilitation Scheme and to designate the said lands for Affordable Housing for MHADA *vide* letter dated 10th September 2015 ;

And whereas, after considering the proposal of the MHADA and after making necessary enquiry, Government felt it necessary that the said lands may be deleted from the designation of Slum Rehabilitation Scheme and designated for Affordable Housing for MHADA (hereinafter referred to as ' the proposed modification ') by following the procedure laid down under the section 37(*1AA*) of the said Act ;

And whereas, the Notice regarding the proposed modification was published under sub-section (*1AA*) of the section 37 of the said Act, inviting suggestions/objections from the general public *vide* Urban Development Department. Notice No TPS-1215/2333/CR-112/15/UD-12, dated 3rd September 2016, which appeared in *Maharashtra Government Gazette,* Part-I, Konkan Division dated 6th September 2016, at Page No. 5 to 8 and the Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai was appointed as the officer (hereinafter referred to as " the said officer ") to hear the suggestions/objections in respect of the proposed modification received within the stipulated period and say of the Mumbai Metropolitan Region Development Authority and to submit his report to the Government ;

And whereas, after considering the report submitted by the said officer and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to refuse the porposed modification in respect of an area admeasuring 6280 sq. mt. out of S. No. 86 and to accord sanction to the proposed modification in respect of the rest of the said lands ;

Now, therefore, in exercise of the powers conferred under sub-section *(1AA)(c)* of the said Act, the Government hereby refuses to accord sanction to the proposed modification for an area admeasuring 6280 sq. mt. out of land bearing S. No. 86 and sanctions the proposed modification in respect of the rest of the lands and accordingly amends the said Notification dated 25th July 2005 as follows :—

After the last entry in the schedule of modifications sanctioning the said Development Plan following new entry shall be added.

ENTRY

*"As shown on the part plan, the lands bearing S. No. 86 (pt), 95 and 133 of village Shirdhon, Taluka Kalyan are deleted from the designation of Slum Rehabilitation Scheme as shown in the sanction Development Plan of Ambarnath, Kulgaon-Badlapur Surrounding Notified Area and designated as Affordable Housing for Maharashtra Housing and Area Development Authority."*

A copy of the sanctioned modification shall be kept open for inspection by the general public in the offices of the following officers for the period of one month :—

1. Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Regional Development Authority.
2. The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.
3. Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

This Notification shall also be available on the Government website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASHOK K. KHANDEKAR,
Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.